SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : Director Office –( 0231)2609068 CAP Section – (0231)2609317/2609110 Website – www.unishivaji.ac.in, Email – cap@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४, महाराष्ट्र
दुरध्वनी : संचालक कार्यालय-०२३१ २६०९०६८ मध्यवर्ती मूल्यमापन विभाग-०२३१ २६०९३१७/२६०९११० संकेतस्थळ - www.unishivaji.ac.in, ई-मेल आयडी - cap@unishivaji.ac.in
Estd. 1962 "A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Ref. No. SU/Exam/CAP/ 959 Date : 23 JUN 2025

-: अत्यंत महत्वाचे व तातडीचे :-

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्राच्या पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष परीक्षेच्या उत्तरपत्रिका महविद्यालय स्तरावर मूल्यमापनाबाबतची कार्यपध्दती.**

**संदर्भ : या कार्यालयाचे Ref. No. SU/Exam/CAP/795, दि.१९/०४/२०२५ रोजीचे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणांस, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयास अनुसरून पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांचे आयोजन व उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज **मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्राकरीता** महाविद्यालयीन स्तरावर करण्यास मान्यता दिली असलेचे आपणांस उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार भाग- १ परीक्षेसाठी परीक्षा केंद्र व उत्तरपत्रिका मूल्यमापन केंद्र मंजूर आहे, अशा महाविद्यालयांच्या बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी., बी. व्होक. सर्व अभ्यासक्रम, बी.बी.ए., बी.सी.ए. व बी.ए.बी.एड्. भाग- १ परीक्षेच्या उत्तरपत्रिका मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर करण्यात येत आहेत.

आता सदर परीक्षेंच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनाच्या अनुषंगाने ऑक्टो./नोंव्हें. २०२४ सत्राच्या प्रथम वर्ष परीक्षेसाठी तयार करण्यात आलेली कार्यपध्दती मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्राकरीता लागू करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची कार्यपध्दती आपणांस पुनःश्च पाठविण्यात येत आहे. त्यानुसार सदरच्या कार्यपध्दतीमध्ये नमूद केलेल्या पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या **फक्त मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्राच्या** प्रथम वर्ष परीक्षांचे आयोजन व उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन कामकाजाच्या अनुषंगाने महाविद्यालयीन स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

तसेच **सदरचे पत्र व कार्यपध्दती सर्व संबंधीतांच्या तात्काळ निदर्शनास आणावी, ही विनंती.**
**कळावे,**

आपला विश्वासू,
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत :- वरीलप्रमाणे**
**प्रत – माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.**

1. मा. कुलगुरु कार्यालय
2. मा. प्र-कुलगुरु कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
5. मा. वित्त व लेखा अधिकारी कार्यालय
6. परीक्षा विभागातील सर्व संबंधीत विभाग व सर्व अधिकारी
7. आय.टी.कक्ष
8. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
9. विद्यार्थी सुविधा केंद्र
10. इंटरनेट विभागास सदरचे पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी